# जाहीर आवाहन

पुणे शहरामध्ये कोरोना या विषाणूच्या संक्रमणामुळे महामारी सदृष्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहरात कच-याच्या समस्येने डोके वर काढले आहे. सध्या पुणे शहरामध्ये २१०० मे.टन इतका कचरा निर्माण होत असून त्यापैकी सुमारे २५० मे.टन इतका कचरा रिसायकलिंग साठी जातो. उर्वरित सर्व कच-यावर प्रक्रिया करण्यात येते. ज्या ठिकाणी कच-यावर प्रक्रिया केली जाते त्या प्रकल्पांमधी काम करणारे मजूर हे बहुतांशी बाहेर गावाकडचे आहेत. कोरोनाच्या विषाणूच्या भितीमुळे ब-याच प्रकल्पावरील कर्मचारी हे काम सोडून त्यांचे गावाला गेले आहेत. यामुळे कच-याचे वर्गीकरण करणे अत्यंत अडचणीचे होत आहे. व त्यामुळेच कच-यावर प्रक्रिया करण्यासाठीसुध्दा बंधने आलेली आहेत.

पुणे शहरातील नागरिक हे नेहमीच स्वच्छतेबाबत पुढाकार घेत असत. त्या अनुषंगाने कच-याच्या समस्येवर देखील आपल्या सर्वाना एकत्रित येऊन काम करावे लागणार आहे. यासाठी कच-याचे वर्गीकरण करून देण्याकरीता वेळापत्रक तयार करण्यात आले असून त्यास अनुसरून सर्व नागरिकांनी यापुढील काळामध्ये ओला व सुका कचरा वर्गीकरण करून संबंधीत कर्मचा-याकडे हस्तांतरीत करावयाचा आहे. रस्त्यावर कोठेही कचरा पडणार नाही/ टाकला जाणार नाही, याबाबत सर्व नागरिकांनी दक्षता घेऊन "कचरामुक्त पुणे" ठेऊन "स्वच्छ पुणे शहर" यासाठी हातभार लावायचा आहे.

**वेळापत्रक**
**सोमवार ते शनिवार**

| साप्ताहिक वार | कच-याचा प्रकार | |
|---|---|---|
| | सुका कचरा | ओला कचरा |
| सोमवार | प्लॅस्टिक/सॅनिटरी नॅपकिन्स डायपर्स | दररोज |
| मंगळवार | ई-वेस्ट कचरा /सॅनिटरी नॅपकिन्स डायपर्स | दररोज |
| बुधवार | मेडिकल वेस्ट कचरा /सॅनिटरी नॅपकिन्स डायपर्स | दररोज |
| गुरूवार | काच, पत्रा व इतर /सॅनिटरी नॅपकिन्स डायपर्स | दररोज |
| शुक्रवार | घरातील टाकाऊ वस्तु व कपडे /सॅनिटरी नॅपकिन्स डायपर्स | दररोज |
| शनिवार | कपडे, चिंध्या, गादया /सॅनिटरी नॅपकिन्स, लहान मुलांचे डायपर्स / ॲडल्ट डायपर्स | दररोज |

आयुक्त
पुणे महानरपालिका

महापौर
पुणे महानगरपालिका